**प्रेसनोट** दिनांक –१७/०६/२०२२

**१) लोकसेवक श्री.शिवदास विजय सोनावणे वय ३० वर्षे, वनरक्षक, कासा नर्सरी, पिंपळशेत कार्यक्षेत्र, कासा (वर्ग–१) २) नितिन जगन्नाथ भोई, वय ३४ वर्षे, धंदा भाजीपाला विक्रेता (खाजगी इसम) यांस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी घेतले ताब्यात**

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | कासा पोलीस ठाणे, जिल्हा पालघर |
| ३ | कलम | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७, ७(अ) प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक श्री.शिवदास विजय सोनवणे वय ३० वर्षे, वनरक्षक, प्रकल्प वनक्षेत्रपाल, कार्यालय पिंपळशेत, कासा ता.डहाणू जि.पालघर (वर्ग–३)<br>२) नितिन जगन्नाथ भोई, वय ३४ वर्षे, धंदा भाजीपाला विक्रेता (खाजगी इसम) |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | १०,०००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/– रुपये |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांचे वनपट्टयातील जमिनीस बांधबंदिस्ती करण्यास हरकत न घेण्यासाठी यातील आरोपीत क्र.१ यांनी तक्रारदार यांचेकडून १०,०००/–रू.लाच घेतली होती. तरी देखील सदर कामासाठी पुन्हा आलोसे क्र.१ यांनी तक्रारदार यांच्याकडे १०,०००/–रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यामुळे तक्रारदार यांनी दिनांक १७/०६/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयात तक्रार दिली<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.१७/०६/२०२२ रोजी तक्रारदार यांना आरोपी लोकसेवक यांना भेटण्यासाठी पंचासह पाठवून पडताळणी केली असता, आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामाचे अनुषंगाने १०,०००/– रूपयाच्या लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम आरोपी क्र.१ यांच्या सांगण्यावरून आरोपीत क्र.२ यांनी दिनांक १७/०६/२०२२ रोजी सायंकाळी २०:४७ वाजताच्या सुमारास कासा पोलीस ठाणे समोर स्विकारली असता आरोपीत क्र.१ व २ यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर प. ४०१ ४०४.

संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com

ऑनलाईन तक्रार :– ––

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री नं. :– 1064

दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297

व्हॉट्स ॲप क्र. :– 9923346810


(नवनाथ जगताप)

पोलीस उप अधीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर

CamScanner